

# अक्षर वाङ्‌मय

अंक : ६४

वर्ष : सोळावे एप्रिल-मे-जून २०२६ अंक : चौथा

संपादक
डॉ. नानासाहेब सूर्यवंशी

आर. एन्. आय. फॉर इंडिया नवी दिल्ली
र. नं. - MAHMAR-36829-2010

ISSN – 2229-4929
UGC Approved and
Peer Reviewed Journal

# अक्षर वाङ्मय

**अंक : ६४**

**वर्ष : सोळावे अंक : चौथा**

**एप्रिल-मे-जून २०२६**

संपादक
**डॉ. नानासाहेब सूर्यवंशी**

कार्यकारी संपादक
**डॉ. शिवाजीराव देशमुख**

मार्गदर्शक
**डॉ. अरुण प्रभुणे**

संपादक मंडळ

**डॉ. विजय वारकड** **डॉ. दीपक चिद्दरवार**
**डॉ. रत्नाकर बेडगे** **डॉ.अंजली मस्करेन्हस**

अमेरिकेतील समन्वयक
**रमेश देशपांडे • सोनाली जांभेकर**

---

प्रकाशक : सौ. रेखाताई नानासाहेब सूर्यवंशी, प्रतीक प्रकाशन,
'प्रणव', रुक्मे नगर, थोडगा रोड, अहमदपूर ४१३५१५.
मुद्रक : श्री जे प्रिंटर्स, प्रा.लि., १४१६, सदाशिव पेठ, पुणे-४११ ०३०
**साहित्य व वर्गणी पाठविण्याचा पत्ता :** डॉ. नानासाहेब सूर्यवंशी
'प्रणव', रुक्मे नगर, थोडगा रोड, अहमदपूर, ता. अहमदपूर
जि. लातूर ४१३५१५. भ्रमणध्वनी : ९४२३६५५८४१
E-mail : suryawanshinanasaheb67@gmail.com.

**वार्षिक वर्गणी :** रु. ५००/- **द्विवार्षिक वर्गणी :** रु. ९००/-
**पंचवार्षिक वर्गणी :** रु.२०००/- **अंकाचे मूल्य :** रु. १२५/-

---

*** महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.**

*** या अंकातील लेखांतून व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक, संपादक मंडळ, प्रकाशक व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.**

R. N. I. FOR INDIA New Delhi
R. No. – MAHMAR-36829-2010

ISSN – 2229-4929
UGC Approved and
Peer Reviewed Journal

# AKSHAR WANGMAY

**ISSUE : 64**

**Year : 16 Volume : 4**

**April-May-June 2026**

Editor-in-Chief
**Dr. Nanasaheb Suryawanshi**

Executive Editor
**Dr. Shivajirao Deshmukh**

Advisor
**Dr. Arun Prabhune**

Editorial Board
**Dr. Vijay Warkad**
**Dr. Ratnakar Bedge**
**Dr. Deepak Chiddarwar**
**Dr. Anjali Mascarenhas**

U.S.A. Coordinator
**Ramesh Deshpande • Sonali Jambhekar**

Publisher : Sou. Rekhatai Nanasaheb Suryawanshi, Pratik Prakashan, 'Pranav', Rukme Nagar, Thodga Road, Ahmedpur 413515

Printer : Shri J Printers Pvt.Ltd. 1416, Sadashiv Peth, Pune 411 030

**Address for sending articles and fees :** Dr. Nanasaheb Suryawanshi
'Pranav', Rukme Nagar, Thodga Road, Ahmedpur 413515
District : Latur
Mobile phone : 9423655841
E-mail : suryawanshinanasaheb67@gmail.com

**Subscription Rates Yearly :** Rs. 500/-
**Two years :** Rs. 900/-
**Five Years :** Rs. 2000/-
**Current Volume :** Rs. 125/-

* Maharashtra State Literary and Cultural Board has granted funds for the Publication of this Journal. But Maharashtra State Literary and Cultural Board has not been responsible for writers opinion in this Journal.

* The content and opinions expressed in the articles are the views of the authors and do not necessarily reflect the views and opinions of the periodical's Editorial Board, publisher or the advisor. The authors are solely responsible for the facts and accuracy of the content of the articles.

# अनुक्रम


- संपादकीय ---------------------------------- ०४
- मुखपृष्ठाविषयी ---------------------------------- ०७
- भारतीयता आणि श्रीमद्भागवत ------------------------- १५
  **डॉ. विद्यासागर पाटंगणकर**
- नेमाडपंथी अभिनव भाषांतर प्रणाली ------------------- २२
  **डॉ. साहेब खंदारे**
- गोमंतकीय स्वातंत्र्य संग्रामावार आधारित मराठी साहित्याचा संशोधनात्मक परामर्श -------------------------- ३१
  **डॉ. विनय मडगावकर**
- दशमहाविद्या : समकालीन आकलन ------------------- ४०
  **कु. ऐश्वर्या शेवाळे**
- संत सावतामाळी यांच्या अभंगातील पर्यावरण दर्शन -------- ५२
  **डॉ. कुंदा कवडे**
- मराठी गझल क्षेत्रातील माझी वाटचाल ------------------ ५९
  **डॉ. अविनाश सांगोलेकर**
- श्री. म. माटे यांचा भाषांतर विचार -------------------- ७२
  **डॉ. प्रमोद पडवळ**
- 'संभ्रमाची गोष्ट' : समकालीन वास्तवाचे कारुण्यरूदन --------- ७८
  **डॉ. वैजनाथ अनमुलवाड**
- 'बारोमास'मधून उलगडत जाणारा ग्राम जीवनातील समस्यांचा पट : एक निरीक्षण ------------------------------- ८८
  **विनायक बापट**

❑ 'एडका' मधील धनगर समाजाचे लोकजीवन आणि लोकसंस्कृती -- ९
डॉ. किसन माने
❑ कवितेचे भावसौंदर्य उलगडणारा मौलिक ग्रंथ ------------ १०
डॉ. अशोक रा. इंगळे
❑ 'तथापि' : आशावादी वास्तववादाचा हुंकार ----------- १०
प्रा.डॉ. डी. जे. दमामे
❑ 'मिडल क्लास' शिक्षण व्यवस्थेतील सकारात्मकतेवर प्रकाश ---- १
डॉ. संजय कांबळे
❑ कविता- ------------------------------ १
विलास वैद्य
❑ 'अक्षरवाङ्मय'चे नूतन व नूतनीकरण केलेले वर्गणीदार ------- १
❑ वार्षिक हिशोबपत्रक ------------------- १
❑ संपादक मंडळ ------------------------- १

**'अक्षर वाङ्मय' चीवर्गणी मनीऑर्डर / धनादेश /धनाकर्ष संपादक 'अक्षर वाङ्मय' या नावे किंवा मेल ट्रान्सफरने वर्गणी जमा करावया असल्यास भारतीय स्टेट बँक शाखा, अहमदपूर, जि. लातूर येथे जमा करावी.**

**खाते: संपादक 'अक्षर वाङ्मय' खाते क्र. ३६८३२८४६७५६**

**IFSC बँक क्र. SBIN - 0020041 या बँकेतील**

**अक्षर वाङ्मय खाते क्र. ३६८३२८४६७५६**

**वार्षिक वर्गणी रु. ५००/-**

**द्विवार्षिक वर्गणी रु. ९००/-**

**पंचवार्षिक वर्गणी रु. २०००/-**

**गुगल पे नं.- ९४२३६५५८४१**

# ‘बारोमास’मधून उलगडत जाणारा ग्राम जीवनातील समस्यांचा पट : एक निरीक्षण

– विनायक बापट

प्रस्तावना:

‘बारोमास’ ही सदानंद देशमुख यांची नव्वदोत्तर काळातील एक अत्यंत महत्त्वाची कादंबरी आहे. तोट्यात जाणारा शेती व्यवसाय आणि शेतकऱ्याची होणारी ससेहोलपट, तसेच आधुनिक युगाने शेतकऱ्यांच्या तरूण पिढीसमोर निर्माण केलेले प्रश्न व त्यातून या पिढीला आलेली हताशा या सर्वाचे प्रत्ययकारी चित्रण या कादंबरीतून येते. १९९० नंतर सुरू झालेली जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरणाची प्रक्रिया आणि या सर्वांचा शेती व्यवसायावर आणि एकूणच मानवी सहसंबंधांवर झालेला परिणाम याचेही सूक्ष्म पातळीवरील चित्रण आपणाला या कादंबरीतून दिसून येते. या कादंबरीच्या मांडणी करताना शेतकऱ्यांच्या हालाखिच्या परिस्थितीचे वर्णन करतांना या सर्वाच्या मुळाशी आधुनिक ग्रामजीवनातील ज्या समस्या आहेत त्यांचे दर्शन देखील लेखकांने नेमकेपणाने घडविले आहे.

**विषय प्रवेश :**

ग्रामीण मराठी कादंबरीची परंपरा साधारणतः मराठी कादंबरीच्या प्रारंभापासून सांगता येत असली तरी १९५० नंतरच्या काळात खऱ्या अर्थाने ग्रामीण म्हणता येतील अशा कादंबऱ्या रचल्या जाऊ लागल्या. १९९० नंतरच्या काळात ग्रामीण कादंबरी हाच कादंबरी वाङ्मय लेखनातील सर्वात सशक्त प्रवाह म्हणून पुढे आला आहे व नव्वदोत्तर काळात विपूल प्रमाणात ग्रामीण कादंबरी लेखन केले जात असल्याचे दिसते. यातही विदर्भातील लेखकांनी अधिक सशक्तपणे नव्वदोत्तर काळात ग्रामीण कादंबरी लिहिली असेही एकूण प्रकाशित झालेल्या कादंबऱ्यांचा आढावा घेतल्यास दिसून येते. समस्याप्रधानता हा ग्रामीण कादंबरी लेखनांमागील मुख्य उद्देश असल्याचे आपणाला दिसून येते. बहुतेक मराठी ग्रामीण कादंबऱ्या

या समस्याप्रधान आहेत असेही आपणाला दिसून येते. सदानंद देशमुख हे नव्वदोत्तर काळातील महत्त्वाचे कादंबरीकार त्यांची साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त झालेली 'बारोमास' ही कादंबरी मराठी ग्रामीण कादंबरीच्या इतिहासातील मैलाचा दगड ठरावी अशी कादंबरी. अनेक कारणांसाठी ही कादंबरी वैशिष्ट्यपूर्ण ठरत असली तरी शेतीतील समस्या, शेतकरी वा कष्टकरी समाजातून शिक्षण घेऊन पुढे आलेल्या तरूणांच्या रोजगाराच्या समस्या, बदलत्या परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या समस्या अशा अनेक समस्यांचे दाहक पण वस्तुनिष्ठ चित्रण सदानंद देशमुखांनी या कादंबरीतून केले आहे म्हणूनच या कादंबरीच्या बलस्थानांबद्दल बोलताना प्रसिद्ध समीक्षक रामचंद्र काळुंखे यांनी ''या कादंबरीत केवळ शेती व्यवसायाचा चिंचोळा प्रश्न न येता खेड्यातील शेतकरी त्यांच्या आत्महत्या ग्रामीण भागातील तरुण पिढीचे प्रश्न भ्रष्ट राजकारण ग्रामीण आणि नागरी व्यवस्थित पडत असलेले अंतर ग्रामीण समाजाची होणारी फरपट अशा समकालीन प्रश्नाला एकाच सूत्रात बांधून जागतिकीकरणाचे परिणाम नव्या अर्थव्यवस्थेत शेतीचे झालेले अवबंदन आणि एकूण स्थिती यशस्वीरित्या चित्रीत केली गेलेली आहे.[१] असे म्हटले आहे. एकूण आजच्या शेतीची व्यथा वेदनाच या कादंबरीतून व्यक्त झाली आहे.

**शेतीतील समस्यांचे चित्रण :**

शेतीचे आधुनिकीकरण झाले. जास्त उत्पादने देणारी संकरीत वाणे लावण्यात आली; परंतु यातून मिळणारे उत्पन्न जास्त वाटत असले तरी खर्च त्यापेक्षा जास्त वाढल्याने शेतकऱ्याचे नुकसानच झाले त्याचबरोबर रासायनिक खते व कीटकनाशके वापरल्याने जमिनीचा पोत बिघडला व ही उत्पादने निसत्त्व असल्याने शेतकऱ्यांच्या आरोग्याचीही हेळसांड झाली. या संदर्भात नानू आजाने केलेले विश्लेषण चिंतनीय आहे तो म्हणतो, ''अरे, अशी कशी ही आधुनिक शेती? तुमच्या घरात काईच माल नाई. हे त घर खंदून आंगण भरणं चाललं. तुमच्या खड्ड्यातली माती खड्ड्यातच आटून राह्यली.''[२] वाढलेला उत्पादन खर्च, वाढत्या खर्चामुळे पेरणीची जुळवाजुळव करण्यासाठी येणाया ताण, हायब्रीडचे उत्पन्न लवकर मिळाले व गावरान ज्वारी, गहू उशिरा पेरले की पाखरे त्यावर झडा मारीत हे सर्व पाहिल्यावरआधुनिक शेतीने शेतकऱ्यांची प्रगती करण्याऐवजी

त्यांची अधोगतीच केली. त्यांच्या समस्यांमध्ये भर घातली असे म्हणावे लागते. शेती ही निसर्गचक्रावर आधारलेली आहे परंतु रासायनिक कीटकनाशकांच्या वापराने हे शेतीचे नैसर्गिक चक्र बिघडू लागले आहे. आपल्या लहानपणी कितीतरी असलेले पक्षी आता विरळ झाले कारण रासायनिक द्रव्ये फवारलेले दाणे, अळ्या खावून ते मृत झाले आहेत तर या रासायनिक फवाऱ्यांविरुद्ध आपली प्रतिकारशक्ती वाढवल्याने अनेक अळ्या फवारणी करूनही पिकाची नासाडी करू लागल्या व त्यांना मारण्यासाठी आणखी रासायनिक फवारे व त्याचे शेतीवर व निसर्गावर होणारे दुष्परिणाम म्हणजे या आधुनिक शेतीमुळे शेतकरी एका न संपणाऱ्या दुष्टचक्रात अडकला आहे व याचे नेमके दर्शन लेखकांने घडविले आहे.

शेतकऱ्यांना अनुदान मिळते असे सर्वांना वाटते पण अनुदान प्रत्यक्षात शेतकऱ्यांपर्यंत पोहचतच नाही. यातही फायदा व्यापाऱ्यांचाच होतो. शेतीचे आधुनिकिकरणामुळे विजेच्या मोटारी आल्या. त्यामुळे पाण्याचा जास्त उसपा होऊन शेतीच्या पाण्याचे संकट निर्माण होत आहे तर लो व्हॉल्टेजमुळे मोटारी एकसारख्या जळतात आणि त्यांच्या दुरूस्तीचा खर्च शेतकऱ्याला परवडेनासा होतो. शेतातील कामासाठी मजूर मिळवणे आणि त्यांची मजूरी ही शेतकऱ्याची मोठी समस्या आहे. मजूरांना मजूरी ठरल्याप्रमाणे द्यावीच लागते. त्याला मजुरीच्या रूपाने रोख पैसे मिळतात पण येणारे उत्पन्न आणि मंजुरीसहीत त्यासाठी आलेला खर्च पाहता शेतकरी अधिक कर्जात बुडतो. म्हणजे शेतीपेक्षा मजूरी बरी अशी शेतकऱ्याची अवस्था झाली आहे. फॅक्टरीत उत्पादीत होणाऱ्या कोणत्याही गोष्टीची किंमत त्याचा उत्पादन खर्च काढून ठरवली जाते; पण शेतमालाची किंमत मात्र व्यापाऱ्यांच्या मर्जीने ठरवली जाते. त्यामुळे पिकलं नाही तरी शेतकरी मरतो आणि अधिक पिकलं तरीही मरतो. या संदर्भात कादंबरीतील एक पात्र तेजराव खपके जे उद्‌गार काढतो ते उद्‌गार म्हणजे समस्त शेतकरी वर्गाची भळभळती वेदना आहे तो म्हणतो,

"शेतकऱ्याच्या पोटी जल्माले येणं म्हणजे मागल्या जन्मातलं पाप फेडणं झालं आता. जो शेतकऱ्याचे पोटी जल्माले आला, समजावं की यानं मांगल्या जल्मात लय पाप केलं!"[३] सर्वत्र पसरलेला भ्रष्टाचार ही शेतकऱ्याची मोठी समस्या झाली आहे. साधा सात-बारा चा उतारा घेणारा, तरी पैसे चारावे

लागतात. प्रत्येक जण शेतकऱ्याला लुटतो.

**सुशिक्षित शेतकरी मुलांच्या समस्या :**

खरे तर सुशिक्षित शेतकऱ्यांच्या मुलांची बेकारी हा विषय या कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे असे म्हणता येते. कादंबरीचा नायक एकनाथ शेती करतोय कारण पदव्युत्तर शिक्षण घेऊनही त्याला एक लाख रुपये लाच देण्याएवढे पैसे त्याच्याकडे नसल्याने त्याला प्राध्यापकाची नोकरी मिळू शकलेली नाही. त्याचा भाऊ मधू हा देखील चांगला सुशिक्षित आहे पण नोकरी नसल्याने गुप्तधन शोधणाऱ्या टोळीत सामील होऊन रात्रीच्या वेळी धनाचा हंडा शोधीत बसलेला दिसतो. हे दोघांची ही समस्या आहे असे नव्हे, तर दिलिप पवार, रोड्या जाधव, समाधान चांदणे, नथ्थुबा मोगल, तेजस गवई, दिनकर दाभाडे या सर्वांचीच ही व्यथा आहे. दिनकर दाभाडे एम.ए. प्रथमश्रेणीत पास होऊनही वरातीत सनई वाजविण्याचे काम करतो. एकनाथची बहीण मंगल हिचा मुलगा राजू आपण का शिकलो नाही याचे स्पष्टीकरण देतो ते खेड्यातील शिक्षण घेतलेल्या पण बेकार असलेल्या तरूणांचे मनोगतच आहे असे म्हणता येते तो म्हणतो, ‘‘नाई सोडपिच्छा केला शिक्षणाचा. काई परसेंटेज पडत नवते जास्त. अन कमी परसेंटेजचा काई फायदा व्हत नाई. डी.एड्. बीयेडले नंबर लागत नाई. शहेरगावातले लोकं बरोबर पैसे भरून त्याह्यच्या पोरायले जास्त मार्क पाडतात. बरोबर त्याह्यचाच नंबर लावतात. खेडेगावातल्या पोरायले कोणी हूंगत नाई. कितीकबी डोळे फोडू फोडू वाचा. आपून काठावरच. अन् ते ऐंशी–नव्वदात. कितीबी शिकलो तरी पळसाले पानं तीनच राह्यतात. नवकऱ्या लागतच नाईत. आमच्याच गावात पंधरा पोरं डी.एड., अन् एकवीस पोरं आय.टी.आय. करेल हायेत. आठ आठ वर्षापासून नवकऱ्या नाईत त्याह्यले. आता तं ते वावराच्याबी कामी राह्यले नाई. निरानाम पेंदाणे झाले. ते पाहून मी सोडपिच्छा केला. कुठी सालावर सालं गमावता. म्हन्लं, आपलीबी गत एकनाथमामा अन् मधुमामासारखी व्हायची... त्याच्यापेक्षा ज्यो करायचा त्यो कामधंदा करून निदान ठसणीत तं जगता येते. कोणाची हाईक नाई अन् कोणाची दईक नाई...’’[४] शिक्षण घेऊन बेकार राहण्यापेक्षा शिक्षण न घेता शेती केलेली बरी. किमान अपेक्षाभंगाचे चटके तरी सहन करावे लागत नाहीत. असे वाटणे म्हणजेच आजच्या ग्रामीण

भागातील सुशिक्षित तरुणाची बेकरीमुळे किती दारूण अवस्था झाली आहे व्यक्त होते.

**समारोप :**

'बारोमास' कादंबरीची जी अनेक वैशिष्ट्ये सांगता येतात, त्यातील एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे आजच्या ग्रामजीवनातील समस्यांचा नेमकेपणाने घेतलेला वेध! शेतीमधील समस्या आणि त्या निर्माण होण्यामागील कारणे यांचा नेमका आढावा या कादंबरीतून घेण्यात आला आहे. व आज शेतकऱ्यावर आत्महत्या करण्याची पाळी का येत आहे याचे अगदी नेमके विश्लेषण या कादंबरीतून आले आहे. तसेच बेकारीमुळे सुशिक्षित तरूण अनैतिक धंद्यांकडे कसे वळतात याचे वर्णनही नेमकेपणाने आले आहे. एकूणच आधुनिक काळातील शेतीतील समस्या आणि शेतकऱ्यांच्या, कष्टकऱ्यांच्या सुशिक्षित मुलांमध्ये बेकारीमुळे निर्माण होणारी अस्वस्थता यांचे सखोल विश्लेषण ही कादंबरी करीत असल्याने नव्वदोत्तर काळात लिहिलेल्या गेलेल्या ग्रामीण मराठी कादंबरी लेखनातील ही एक महत्त्वाची कादंबरी ठरली आहे.

**संदर्भ टीपा :**


१. काळुंखे, रामचंद्र, '१९८० नंतरची ग्रामीण कादंबरी', वावरे, प्रल्हाद, जोशी, अभय, (संपा.) 'मराठी कादंबरी: प्रवाह व समीक्षा' नभ प्रकाशन, अमरावती, २०११, पृ.९७
२. देशमुख, सदानंद, 'बारोमास', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २०१८ पृ.९.
३. उ.नि.पृ.२२१
४. उ. नि. पृ.१७२



**विनायक ल. बापट**
मराठी अध्ययनशाखा
शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा
गोवा विद्यापीठ, ताळगांव, गोवा.
भ्रमणध्वनी- ९७६४९७१२५६, ९४२३८३४५८५.


□□□